## नाशिक निर्मिती प्रशिक्षण केंद्रातर्फे जल विद्युत केंद्रातील कारागिरांकरिता ६ आठवडयांचे अभिक्रम प्रशिक्षण




प्रशिक्षण समारोप प्रसंगी मनोगत व्यक्त करताना महाव्यवस्थापक श्री.आर.डी. कदम.

केंद्रीय विद्युत आयोगाच्या (Central Electricity Authority, New Delhi) भारतीय विद्युत नियम १९५६ नुसार विद्युत निर्मिती केंद्रामध्ये काम करणाऱ्या कारागिरांसाठी ४० आठवडयांचा अभिक्रम प्रशिक्षण अनिवार्य आहे. त्यानुसार जल विद्युत केंद्रामध्ये काम करणाऱ्या कारागिरांसाठी ''सहा आठवडयांचे थेओरेटिकल प्रशिक्षण'' जल विद्युत संकुल, पोफळी येथे दिनांक १९.०१.२००९ ते २७.०२.२००९ या कालावधीत नाशिक निर्मिती प्रशिक्षण केंद्रातर्फे घेण्यात आले.

सदर प्रशिक्षण तुकडीत कोयला जल विद्युत संकुल, पोफळी तसेच पानशेत, भाटघर, राधानगरी, तिल्लारी, पैठण, येलदरी व वैतरणा जल विद्युत केंद्रातील एकुण २७ कारागिरांनी भाग घेतला. ६ आठवडयाच्या थिओरेटिकल प्रशिक्षणानंतर दिनांक २७.०२.२००९ रोजी प्रशिक्षणार्थी कारागिरांना त्यांच्या विद्युत केंद्रात पुढील ३४ आठवडयांच्या इनप्लांट प्रशिक्षणासाठी कार्यमुक्त करण्यात आले.

या प्रसंगी प्रशिक्षणामुळे जल विद्युत केंद्राविषयी सखोल माहिती मिळाली व त्यामुळे काम करण्यासाठी आत्मविश्वास वृद्धिंगत झाल्याचा अभिप्राय प्रशिक्षणार्थी कारागिरांनी व्यक्त केला. प्रशिक्षणार्थी कारागिरांना मराठी भाषेत तयार केलेली 'मार्गदर्शक पुस्तिका' देण्यात आली, प्रशिक्षणार्थी कारागिरांनी आपल्या लेखी अभिप्रायामध्ये तसेच मनोगतात प्रशिक्षणाबाबत समाधान व्यक्त केले.

श्री.एस.बी. भांदेकर, अधीक्षक अभियंता (निर्मिती प्रशिक्षण) नाशिक निर्मिती प्रशिक्षण केंद्र, यांनी आपल्या भाषणात कारागिरांना या प्रशिक्षणाच्या माध्यमातुन जे ज्ञान मिळाले त्याचा उपयोग महानिर्मितीच्या प्रगती करिता करावा, असा संदेश दिला.

श्री.आर.डी. कदम यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात प्रशिक्षणार्थी कारागिरांना यथोचित बहुमोल मार्गदर्शन केले.

नाशिक निर्मिती प्रशिक्षण केंद्रातर्फे श्री.एस.एस. गुरव उपकार्यकारी अभियंता, श्री.अजय नेटके सहाय्यक अभियंता व श्री.मुकेश भावसार, सहाय्यक अभियंता यांनी तर पोफळी जल विद्युत केंद्र श्री.तपस्वी,, दुय्यम अभियंता यांनी बॅचेसचे समन्वयक म्हणुन काम बघितले. निरोप समारंभाचे सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्री.पी.व्ही. जाधव सहाय्यक अभियंता, जल विद्युत केंद्र पोफळी यांनी केले.



राष्ट्रीय ब्रिज स्पर्धेत अव्वल क्रमांक प्राप्त करणाऱ्या महानिर्मितीच्या संघासह मा.श्री.अरविंद चौधरी, तत्कालीन मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.), श्री.सगीर खान, श्री.अनिल मुसळे, श्री.संजय अस्वले.

## कण्हेर ज.वि. केंद्रातील यशोगाथा : आपणही घेऊ प्रेरणा



कण्हेर जलविद्युत केंद्र दिनांक २० मार्च १९९७ रोजी महाराष्ट्र शासनाकडून महानिर्मिती कडे हस्तांतर करण्यात आले तेव्हापासुन जनरेटर ट्रान्सफॉर्मर (5MVA) चे ऑईल व वाईडींगचे टेंपरेचर 75°C चे वर वाढत असे ते कंट्रोल करण्यासाठी फॅन तसेच पाणी सोडण्यात येत असे. वारंवार DGA Test देखित घेण्यात येत असत. परंतु त्याचा प्रॉब्लेम काय आहे ते समजत नसे. ऑक्टोबर २००७ मध्ये तीन रेडीयटर वाढवून कुलींग एरिया वाढवण्यात आला तरी देखिल फारसा उपयोग झाला नाही. दिनांक २०.११.२००८ रोजी ट्रान्सफॉर्मर डिफरेन्शिअल वर ट्रीप झाला. टेस्टिंग केले असता वाइंडिंग मध्ये प्रॉब्लेम आहे असे समजले. त्यानंतर ऑईल ड्रेन करण्यात आले असता फक्त २१०० लिटर ऑईल निघाले. ट्रान्सफॉर्मर चे नेमप्लेट प्रमाणे २६०० ली. ऑईल असायला हवे होते. ऑक्टोबर २००७ मध्ये तीन रेडीएटर म्हणजे ३०० लीटर ऑईलची वाढ करण्यात आली होती. म्हणजे ट्रान्सफॉर्मर मध्ये फक्त १८०० लीटर ऑईल भरले होते व नेमप्लेटमध्ये २६०० लीटर उल्लेख केलेला होता हा ट्रान्सफॉर्मर महती इलेक्ट्रिक कंपनी पुणे यांचा आहे. खरेतर ट्रान्सफॉर्मरमध्ये आमच्या अनुभवाप्रमाणे ३५०० लीटर ऑईल असायला हवे होते. परंतु ऑईल कमी असल्याने योग्यरीतीने वाईन्डींगचे कुलींग होत नव्हते व टेंपरेचर वाढत होते. नंतर ट्रान्सफॉर्मर कोअर इन्स्पेक्शनसाठी बाहेर काढताना असे आढळुन आले की कोअर व टॅंक बॉडीमध्ये फक्त 1½ इंच गॅप होता त्यामुळे कोअर सहजासहजी बाहेर येत नव्हता म्हणून टॅंक ची रूंदी वाढवण्याचा निर्णय घेतला व त्याप्रमाणे टॅंकची रूंदी ४ इंचाची वाढविण्यात आली. तसेच ५ रेडीएटर वाढविण्यात आले. अशा तऱ्हेने ट्रान्सफॉर्मर मधे एकूण ३५०० लीटर ऑईल भरले गेले. वरील ट्रान्सफॉर्मरचे रिवाइंडींग करणे, टॅंक कपॅसिटी वाढवणे तसेच पायरेडिएटर बसविण्याचे काम पॉवर इंजिनिअर्स, कोल्हापूर यांचेकडून करून घेण्यात आले. ट्रान्सफॉमरचे टेस्टिंग व कमिशनिंग झालेनंतर ४ एम.डब्ल्यू. लोड घेण्यात आला त्याचवेळी ट्रान्सफॉमरचे ऑईल टेंपरेचर जास्तीत जास्त 51°C पर्यंत गेले अशा तऱ्हे ट्रान्सफॉर्मर टेपरेंचर वाढीचा प्रश्न सुटलेला आहे.



श्री.खानदे



श्री.डी.टी. पाटील

## प्रकाशगड मुख्यालयात गुणवत्ता मंडळाची स्थापना

महानिर्मितीच्या मुख्य कार्यालय येथील मानवसंसाधन विभागात सर्वात प्रथम गुणवत्ता मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. सदर गुणवत्ता मंडळे मासं विभागातील विविध समस्या सोडवण्याबाबत कार्यवाही करणार आहेत. महानिर्मितीच्या तांत्रिक विभागात असे उपक्रम झाले आहेत. तथापि मानवसंसाधन विभागात प्रथमच असा उपक्रम होत आहे. सदर गुणवत्ता मंडळाना श्री.जी.डी. पाटील, महाव्यवस्थापक (मासं) यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

**गुणवत्ता मंडळ (मासं-देयके) संजीवनी गुणवत्ता मंडळात-** श्री मंगेश पाटील (नेता), सौ.आयरीन नार्वेकर (उपनेता), श्री.प्रकाश माने, सौ.संगीता कचरे, सौ.प्रमोदिनी राऊत, श्री.रामबाबू सिंग, श्री.महेश शिंदे, श्री.पराग टेणी, श्री.प्रभाकर सावंत, श्रीमती मालन मगर यांचा समावेश आहे.

**गुणवत्ता मंडळ (मासं-नोंदणी) नवचेतना गुणवत्ता मंडळात -** श्री.रमेश कांबळे (नेता), श्री.चंद्रकांत वावेकर (उपनेता), श्री.ओमकेश दहिफळे, श्री.सुधाकर मोरे, श्री.आर.एस. माने, श्री.जी.जे. राठोड, श्रीमती अंजली सप्रे यांचा समावेश आहे.